थोर राष्ट्रीय पुरुषांचे साहित्य प्रकाशित करण्यासाठी स्वतंत्र वेबपोर्टल तयार करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण -१११७/(प्र.क्र.२८/१७)/समन्वय
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ०४ मे, २०१८.

संदर्भ :- १) माहिती व जनसंपर्क विभागाचा शासन निर्णय क्रमांक : GAD-मातंसं ०८०/४/२०१४-०/० DIRECTORATE OF IT-DIT (MH), दि.०१/०७/२०१४.
२) माहिती व जनसंपर्क विभागाचा शासन निर्णय क्रमांक : GAD-मातंसं ०८०/४/२०१४-०/० DIRECTORATE OF IT-DIT (MH), दि.२० मार्च, २०१८.

प्रस्तावना :-

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराज, साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे व महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समित्या गठित करण्यात आल्या आहेत. या समित्यांनी प्रकाशित केलेले साहित्य सर्व जगाला मार्गदर्शक ठरणारे असल्यामुळे त्याचे डिजीटायझेशन करुन, सर्व जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी विभागाची स्वतंत्र वेबपोर्टल तयार करण्याबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने निधी उपलब्ध करुन दिला आहे. या कामाची तयारी करण्यासाठी माहिती व तंत्रज्ञान विभागाने निर्गमित केलेल्या दि.०१/०७/२०१४ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार एका सल्लागार कंपनीची PIC मार्फत निवड करावयाची होती. त्यानुसार दि.१५/०३/२०१८ च्या PIC च्या बैठकीमध्ये KPMG या सल्लागार संस्थेची RFP तयार करण्यासाठी तसेच याबाबतची निविदापूर्व व निविदा मंजूरीनंतरची प्रकल्प अंमलबजावणी विषयक संनियंत्रणाची कामे करण्यासाठी निवड केली आहे. त्यानुसार वेबपोर्टलच्या शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराज, साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे व महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समित्या गठित करण्यात आल्या आहेत. या समित्यांनी प्रकाशित केलेले साहित्य डिजीटायझेशन करुन, सर्व जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी विभागाची स्वतंत्र वेबपोर्टल तयार करण्याच्या कामासाठी KPMG या सल्लागार संस्थेची RFP तयार करण्यासाठी तसेच याबाबतची निविदापूर्व व निविदा मंजूरीनंतरची प्रकल्प अंमलबजावणी विषयक संनियंत्रणाची कामे करण्यासाठी

M/s KPMG या सल्लागार कंपनीच्या दोन व्यक्तींची निवड माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयातील तरतूदीप्रमाणे Managing Consultant दरमहा रु.२,७९,०००/- व Consultant दरमहा रु.२,२५,०००/- या दरानुसार करण्यात येत आहे. हा दर परिशिष्ट - १ मध्ये नमूद केलेली कामे करण्यासाठी मार्च, २०१९ पर्यंत राहील.

२. KPMG या सल्लागार कंपनीच्या दोन व्यक्तींन RFP चे काम करण्यासाठी माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दि.२०/०३/२०१८ च्या शासन निर्णयात नमूद केलेले दर खालीलप्रमाणे लागू करण्यात येत आहेत. :-

Category	**Experience**	**Rates in INR- Per Month Per Person (Excluding Taxes)**
Managing Consultant	>8 to <=15 Years.	Rs.2,79,000/-
Consultant	>3 to <=5 Years	Rs.2,25,000/-

३. सदर खर्च मागणी क्र. २२०५ कला व संस्कृती, ८०० इतर खर्च, (०१) समिती व समारंभ (०१)(०३) थोर राष्ट्रीय पुरुषांच्या साहित्याचे प्रकाशन (२२०५ ३१४३) या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ च्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात येईल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५०५१३२२२६९७०८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Siddharth Kharat

Digitally signed by Siddharth Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6f8cb55012423727bece629d954713c1ec2962a9ca9b909643170e56321cfd24, cn=Siddharth Kharat
Date: 2018.05.05 13:27:29 +05'30'

(सिद्धार्थ खरात)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. अ.मु.स. (उ. व तं. शि. वि.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.

५. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, मुंबई.
८. सदस्य-सचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई.
९. सदस्य-सचिव, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई.
१०. सदस्य-सचिव, राजर्षि शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई.
११. सदस्य-सचिव, साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समिती, पुणे (संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत प्रत रवाना).
१२. सदस्य-सचिव, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती, औरंगाबाद.
१३. वित्त विभाग (व्यय), मंत्रालय, मुंबई.
१४. संचालक, केपीएमजी ॲडव्हायझरी सर्व्हिसेस प्रा. लि., अपोलो मिल कंपाउंड, १ ला मजला, एन.एम. जोशी मार्ग, महालक्ष्मी, मुंबई - ४०० ०११.
१५. निवडनस्ती.